माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती
AHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION
Amravati Divisional Board, Amravati
Phone no. 0721-2662647 E-mail:- divsecamt@rediffmail.com

**महत्वाचे / परीक्षा प्राधान्य**

पत्र क्र.अविमं / मागो–प्रात्य / 535
अमरावती 444 602
दिनांक :– 11 / 6 / 2026

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
अमरावती विभाग अमरावती.

**विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) पुरवणी परीक्षा जून / जुलै –2026 च्या लेखी व प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा / अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे साहित्य वाटपाबाबत.**

**संदर्भः– राज्य मंडळाचे पत्र क्रमांक रा.मं. / परीक्षा–6 / 2015 पुणे, दि.12 / 05 / 2026**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) पुरवणी परीक्षा जून / जुलै –2026 प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा अंतर्गत मूल्यमापन परीक्षेच्या तारखांबाबत पुढील कार्यवाहीकरीता खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे. विज्ञान व तंत्रज्ञान, NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम व पूर्व व्यावसायिक विषय, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा मंगळवार दिनांक 16 जुन 2026 ते बुधवार दिनांक 08 जूलै 2026 या कालावधीत आयोजित करावयात.

**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील नमुद केलेल्या तारखेपासून व सत्रानुसार शालेय स्तरावर आयोजित करावयाची आहे. त्यानुसार संबंधित विषयांचा प्रश्नपत्रिकेचा संच मिळण्याकरिता अमरावती विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.**

**श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेस पुन्हा प्रविष्ठ व्हावयाचे आहे. याबाबत सर्व संबंधित विद्यार्थ्यास आपले स्तरावरून कळवावे.**

| अ.क्र. | विषय सांकेतांक | विषयाचे नांव | वार | दिनांक | सत्र |
|---|---|---|---|---|---|
| 1. | जे–1 | घरगुती विद्युत उपकरणे<br>Electrical Domestic Appliances | मंगळवार | 16 / 06 / 2026 | दुपार |
| 2. | जे–5 | दूध व दूधाचे पदार्थ<br>Milk And Milk Products | बुधवार | 17 / 06 / 2026 | दुपार |
| 3. | जे–9 | हस्तभरतकाम<br>Hand Embroidery | गुरुवार | 18 / 06 / 2026 | दुपार |
| 4. | के–1 | शिवणयंत्राद्वारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरूस्ती.<br>Stitching with Sewing Machine and its Repairing and Maintenance | शुक्रवार | 19 / 06 / 2026 | दुपार |
| 5. | के–5 | टाकाऊ वस्तुपासून सौंदर्याकृती.<br>Preparation of Decorative pieces by utilization of waste material | शनिवार | 20 / 06 / 2026 | दुपार |
| 6. | एल–7 | पाककला<br>Cookery | सोमवार | 22 / 06 / 2026 | दुपार |
| 7. | एम–3 | भारतीय संगीत (गायन–वादन)<br>Indian Music ( Vocal & Instrumental) | मंगळवार | 23 / 06 / 2026 | दुपार |
| 8. | एम–6 | चित्रकला व रंगकाम<br>Drawing and Painting | बुधवार | 24 / 06 / 2026 | दुपार |
| 9. | एम–7 | कागदकाम पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी.<br>Paperwork,Cardboard work and Bookbinding | गुरुवार | 25 / 06 / 2026 | दुपार |

**टिपः– 1 जिल्हा वाटप केंद्रावर साहित्य वाटप ~~मंगळवार~~ सोमवार दि.15 / 06 / 2026 ला राहील.**
**2 जिल्हा संकलन केंद्रावर साहित्य स्विकारणे बुधवार दि.08 / 07 / 2026 ला राहील.सकाळी 11.00 ते 5.00 या वेळेत खालील जिल्हा वितरण व संकलन केंद्रावर राहील.**

| अ.क. | जिल्हा | वितरण व संकलन केंद्राचे नांव |
|---|---|---|
| 1 | अकोला | न्यु. इंग्लिश हायस्कूल, अकोला |
| 2 | अमरावती | अमरावती विभागीय मंडळ. कार्यालय, टोपेनगर, अमरावती. |
| 3 | बुलढाणा | श्री. शिवाजी हायस्कूल, बुलढाणा. |
| 4 | यवतमाळ | अभ्यंकर कन्या शाळा, यवतमाळ. |
| 5 | वाशिम | श्री. शिवाजी हायस्कूल, वाशिम. |

**महत्वाचे :–**

1) परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा Out Of Turn आयोजित करण्यात येणार नाही . तरी विद्यार्थी संख्येनुसार शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक / तोंडी / श्रेणी / अंतर्गत परीक्षा घेणेबाबत तसेच संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी.
2) विद्यार्थी संख्येनुसार शाळेमध्ये तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा देखील संबंधित शाळेत घेण्यात यावी. संबंधित विद्यार्थी व परीक्षेशी संबंधित सर्व घटकांना परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची सर्व माहिती व आवश्यक त्या सूचना प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी देण्यात याव्या.
3 इ.10 वी व इ.12 वी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिरथ परीक्षक म्हणून ज्या त्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.
4) सदरील साहित्य मुख्याध्यापक यांनी प्रात्य / तोंडी / श्रेणी / अंतर्गत मुल्यामापन परीक्षेचे ऑनलाईन सर्व विद्यार्थ्याचे गुण भरुन तपासून काळजीपुर्वक एकाच सिलबंद पाकिटात खात्री करुन **बुधवार, दि.08 / 07 / 2026 रोजी निर्धारित जिल्हा संकलन केंद्रावर मंडळ प्रतिनिधीकडे न चुकता हस्तपोच सुपूर्द करावे. कोणत्याही परिस्थितीत प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षेचे गुणतक्ते अथवा इतर साहित्य पोस्टाने पाठवू नये.**
5) ऑनलाईन गुणतक्ते व लिखीत उत्तरपत्रिका उशिरा पाठविल्यास किंवा मंडळ कार्यालयास उशिरा प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याचे होणा–या शैक्षणिक नुकसानीस आपण सर्वस्वी जबाबदार राहाल.निर्धारित दिनांकानंतर गुणतक्ते सादर केल्यास राज्य मंडळाचे पत्र क.रा.मं. / परीक्षा–3 / 4705, दिनांक 08 / 08 / 2016 नुसार यथानियम कार्यवाही करण्यात येईल.

सूचना :–

1) **पुरवणी परीक्षेसाठी इ.10 वी व इ.12 वी च्या प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जात होती. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येवून जून–जुलै 2026 च्या इ.10 वी व इ.12 वीची प्रात्यक्षिक**, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा देखील संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये घेण्यात यावी.
2) प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाचे गुण Portal वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत. याबाबतची Link आपणांस यथावकाश कळविण्यात येईल.
3) इ.12 वी माहिती तंत्रज्ञान (I.T.) व सामान्यज्ञान(G.K.) या विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दि. 07 / 07 / 2026 व दि.08 / 07 / 2026 रोजी घेण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेंता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात यावी. कनिष्ठ महाविद्यालयांना संगणक प्रयोगशाळा क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करून त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी याची माहिती परीक्षेपूर्वी करून देणे आवश्यक आहे.
4) विज्ञान विषयाच्या तसेच तंत्र व पूर्व व्यावसायिक प्रात्यक्षिक परीक्षेच्या साहित्याचे वितरण (उदा.उत्तरपत्रिका, गुणतक्ते, डी कव्हर्स इ.) व तोंडी परीक्षेच्या उत्तरपत्रिका, गुणतक्ते, अंतर्गत मूल्यमापनाचे गुणतक्ते वाटपाच्यावेळी नियोजित जिल्हा वितरण केंद्रावर करण्यात येत आहे.
५) प्रात्यक्षिक परीक्षेकरीता अग्रिम रक्कम देण्यात येणार नाही, प्रात्यक्षिक खर्चाची देयके सादर केल्यानंतर निकषानुसार खर्चाची रक्कम शाळेच्या खात्यात जमा करण्यात येईल. मुख्याध्यापकाने शाळेचा राष्ट्रीयकृत बँकेचा खातेकमांक व आयएफएससी कोड प्रात्यक्षिक खर्च पुस्तिकेवर नमूद करावा.
6) **प्रात्यक्षिक परीक्षेच्या खर्चाची लेखापुस्तिका दिनांक ०8 / 07 / 2026 रोजी प्रात्यक्षिक साहित्यासोबतच स्वतंत्र सदर करावी.**
7) प्रात्यक्षिक परीक्षा सुरू असतांना विज्ञान विषयाकरिता अंतर्गत परीक्षक / बहिःस्थ परीक्षक आणि प्रयोगशाळा कर्मचारी या शिवाय इतर दुस–या कोणासही प्रयोगशाळेत येण्याची परवानगी देण्यात येवू नये.
8) अंध, मुकबधिर, स्पॅस्टीक या विद्यार्थ्यांनी ऐनवेळी बदल करून घेतलेल्या विषयाबाबत या कार्यालयास लेखी सूचना त्वरीत देणे आवश्यक आहे. म्हणजे अशा विद्यार्थ्याच्या प्रश्नपत्रिका पुरविणे सोईचे होईल.
9) मुख्याध्यापकांनी प्रात्यक्षिक परीक्षेबाबत व तारखेबाबतच्या सूचना, सूचना फलकावर ठळकपणे लावाव्यात.

**(प्रिया देशमुख)**
**विभागीय सचिव,**
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

**प्रत माहिती व योग्य कार्यवाहीस्तव :–**

1. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग अमरावती.
2. शिक्षणधिकारी (माध्य.) जि. प. अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम यांना माहितीस्तव.
3. शाखाप्रमुख, लेखा शाखा, भांडार शाखा, माध्यमिक परीक्षा शाखा अमरावती विभागीय मंडळ, अमरावती यांना योग्य कार्यवाहीस्तव.